# पीक प्रात्यक्षिकासाठी नोंदणीकृत गटांनी ऑफलाइन अर्ज करावेत

**मूर्तिजापूर :** तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत नोंदणीकृत शेतकरी गट,सेवा सहकारी संस्था व शेतकरी उत्पादक कंपनी यांच्याकडून सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस पीक अर्ज प्रात्यक्षिकाकरिता मागविण्यात येत आहेत. मूर्तिजापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे १४ ते १६ जून या दोन दिवसांच्या कालावधीत उपरोक्त संस्थांनी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑफलाइन पद्धतीने शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था सोसायटी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. ३१ मार्च २०२४ पूर्वी नोंदणीकृत गटांनी, शेतकरी उत्पादक कंपनी, सेवा सहकारी संस्था सोसायटी यांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव सादर करावे. १७ जून रोजी सकाळी ११ वाजता प्राप्त प्रस्तावांची लॉटरी पद्धतीने निवड करून पीक प्रात्यक्षिके अंतर्गत बियाणे देण्यात येणार आहे. तरी विहित वेळेत तालुका कृषी अधिकारी कार्यालय मूर्तिजापूर येथे संबंधितांनी अनुदानावरील पीक प्रात्यक्षिककरिता करावयाचा अर्जाचा नमुना, आवश्यक कागदपत्रे तालुक्यातील सेतू केंद्रावर उपलब्ध करण्यात आलेले आहेत. ज्या गटांना काही अडचण असल्यास आपल्या गावचे सहायक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी किंवा मंडळ कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे यांनी केले आहे.

# कौलखेड चौकात यवतमाळ येथील व्यक्तीची हत्या

## चार तासात प्रकरणाचा उलगडा,पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या

**▪अकोला,दि १५(प्रतिनिधी) :**

**शहरातील कौलखेड चौकात शनिवारी मध्यरात्री झालेल्या थरारक हाणामारीत एकाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी पहाटे उघडकीस आली. मृतक हा यवतमाळ येथील मूळ रहिवासी असून, गंगाधर डाबेराव (वय ३२) असे त्याचे नाव असल्याचे समोर आले आहे.शनिवार १४ जूनच्या मध्यरात्री अकोला शहरातील खदान पोलीस स्टेशनच्या हद्दीतील कौलखेड चौकात ही घटना घडली.**




प्राप्त माहिती नुसार शनिवारी रात्री १२:३० च्या सुमारास, दोन व्यक्ती नशेत धुंद अवस्थेत लाकडी दंडुका आणि दगडाने एकमेकांवर हल्ला चढवित होते. काही क्षणातच ही हाणामारी इतकी उग्र झाली की, यवतमाळ येथील रहिवासी गंगाधर डाबेराव (वय ३२) याचा जागीच मृत्यू झाला. रविवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास स्थानिक नागरिकाने रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह पाहून पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच अकोला शहर उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक शंकर शेळके व खदान पोलीस स्टेशनचे निरीक्षक मनोज केदारे ताफा सह घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला.या प्रकरणाच्या तपासात स्थानिक गुन्हे शाखा सक्रिय झाली आहे. प्राथमिक तपासानंतर एका संशयित इसमाला ताब्यात घेवून त्याची कसून चौकशी सुरू केली. घटनास्थळ जवळील सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि संशयिताचे मोबाईल कॉल रेकॉर्ड तपासले गेले.पो स्टे खदान अकोला येथे फिर्यादी उमेश दिनकर मस्के (वय ४० वर्ष रा. कौलखेड चौक अकोला) यांनी १५ जून रोजी फीर्याद दिली की, १५ जून २०२५ रोजी सकाळी ६ वाजता नेहमी प्रमाणे मी म झे यश धाबाचे गेट उघडणे करीता गेट समोर गेलो असता, इसम गंगाधर डाबेराव (रा. यवतमाळ ह.मु. कौलखेड चौक, अकोला) हा मृत अवस्थेत पडलेला दिसला.

त्यास कोणी तरी अज्ञात इसमाने त्याचे डोक्यावर दगड व काठी मारून त्याचा खुन केल्याचे दिसून आले. फिर्यादीचे अश्या जबानी रिपोर्ट वरून पो स्टे खदान अकोला येथे खुनाचा गुन्हा दाखल करून तपासावर घेण्यात आला. सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेणे बाबत पोलीस अधिक्षक यांनी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा अकोला व त्यांचे पथकास आरोपीचा तात्काळ शोध घेण्या बाबत आदेशीत केले. त्यावरून पोलीस निरीक्षक शंकर शेळके स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांनी आरोपीचा शोध घेणे बाबत वेगवेगळे पथक तयार करून तपास कामी रवाना केले.सदर पथकातील अधिकारी कर्मचारी यांनी पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हयाचा आरोपीचा शोध घेण्याबाबत तपास केला असता घटनास्थळावरील सिसिटीव्ही फुटेज तसेच गुप्त बातमीदार यांचे कडुन माहीती प्राप्त करून रोहीत राजु सोळंके (वय अंदाजे १८ वर्ष रा. नागे लेआउट कौलखेड अकोला) यास ताब्यात घेवुन गुन्ह्या संबधाने विचारपुस केली असता, त्याने सांगीतले की, मृतक याने रोहीत सोळंके यास दारू पिण्याकरीता पैसे मागीतले.

रोहीत याने नकार दिल्याने मृतक याने रोहीत सोळंके सोबत वाद घालुन शिवीगाळ केली. त्याच रागातुन रोहीत सोळंकेने गंगाधर डाबेराव याला काठी व दगडाने डोक्यावर मारहाण करून जिवानीशी ठार मारले असे सांगीतले. यावरून आरोपी रोहीत राजु सोळंके यास पुढील तपास कामी पो. स्टे खदान यांचे ताब्यात देण्यात आले.सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधिक्षक अभय डोंगरे यांचे म ार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## ऑपरेशन प्रहार अंतर्गत

# अवैध गावठी दारूच्या अड्यावर छापा

## ६७ हजार ८०० रु. चा मुद्देमाल जप्त

**▪अकोला,दि १५(प्रतिनिधी) :**

मा. श्री. अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे. आज दिनांक १५.०६.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त बातमी वरून श्री शंकर शेळके पोलीस निरीक्षक स्थागुशा अकोला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बार्शिटाकळी हददीतील ग्राम शिंदखेड मोरेश्वर येथे अवैध रित्या गावठी दारू हातभट्टी काढत असलेल्या ठिकाणी छापे टाकून गावठी हातभटटी दारू २४ लिटर ४८००/- रू. तसेच दारू काडण्याकरीता वापरण्यात येणारा ४२० लिटर सड़वा किं अं ६३८००रु असा एकुण ६७ हजार ८००रू चा मुददेमाल



जप्त करून अवैध रित्या तयार केलेल्या दारूचा नाश करण्यात आला व तेथील दारूचे गुत्थे नष्ट केले. आरोपी नामे शहदेव शंकर अवचार याचेवर पोलीस स्टेशन बार्शीटाकळी येथे क. ६५ई क.ड.फ महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई माननीय श्री. अर्चित चांडक सा. पोलीस अधीक्षक अकोला, मा. श्री. अभय डोंगरे सा. अप्पर पोलीस अधीक्षक अकोला, श्री. शंकर शेळके पोलीस निरीक्षक स्थागुशा अकोला यांच्या मार्गदर्शनात जिपीएसआय दशरथ बोरकर, पोहवा गोकुळ चव्हान, पोअं स्वप्नील खेडकर, अन्सार अहमद, लीलाधर खंडारे चालक पोअं मनिष ठाकरे यांनी केली आहे.

# शेती मशागतीची कामे अंतिम टप्प्यात

**▪बार्शिटाकळी,दि १५(प्रतिनिधी) :**

तालुक्यातील पावसाची शेती मशागतीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. शेत शिवारात पेरते व्हा पक्ष्यांचा किलबिलाट चालू झाला असून, लवकरच पेरणीयोग्य 'सुरुवात होण्याचे संकेत मिळत असल्याने, शेतकरी खरिपाच्या पेरणी साहित्य खरेदीच्या कामाला लागला असून दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहे. पूर्वीपासूनच बार्शिटाकळी तालुक्यात बागायती शेतीचे प्रम ाण कमी आहे.

बहुतांश शेती निसर्गाच्या भरवशावर असल्याने खरिपाची शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. परंतु काही शेतकऱ्यांनी मान्सूनपूर्व कपाशीपिकाची व विविध



भाजीपाला, वेलवर्गीय पिकांची लागवड केली आहे.

गत आठवड्यापासून पावसाळ्याची सुरुवात झाली असून, मृग नक्षत्रातील सात-आठ दिवसांचा कालावधी संपलाआहे. अधून-मधून पावसाच्या हलक्या सरी कोसळल्याने, शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पेरणीपूर्वी तण होणार नाही, याकरिता बैलावरील वखर वाईची कामे मोठ्या प्रम ाणात उरकली आहेत. तसेच काळ्याफणेपुन्हाएकदा वेचून शेत पेरणीसाठी एकदम तयार करून ठेवले आहे. पेरणीपूर्वी शेती तयार करण्याच्या अंतिम टप्प्यात आली आहेत.

## मंजूर काम चालू करण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

**बार्शिटाकळी :** राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांना बार्शिटाकळी तालुक्यातील चिखलगाव फाटा ते चिंचोली रुद्रायणी या मंजूर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम चालू करा, अशा प्रकारचे निवेदन दिले आहे. एक वर्षापूर्वी या रस्त्याचे ५ कोटी ८८ लाख रुपयांच्या डांबरीकरणाचे काम मंजूर झाले. सदर रस्ता अतिशय खराब झाल्याने रस्त्यावरून ये- जा करताना जनतेला त्रास होत आहे. हा रस्ता लवकर चालू करावा, अशा प्रकारचे निवेदन चिंचोली येथील रुद्राक्ष राठोड यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांना १२ जून अकोला येथे भेटीदरम्यान दिले.

# शासकीय दस्तावेज नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**▪अकोला,दि १५(प्रतिनिधी) :**

मारवाडी युवा मंच अकोला शाखा व खंडेलवाल वैश्य सभा यांच्या वतीने आयोजित शासकीय दस्तावेज नोंदणी व अद्ययावत शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्थानिक खंडेलवाल भवनात मंचचे मार्गदर्शक निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत आयोजित या शिबिरात खंडेलवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रमोद खंडेलवाल, खंडेलवाल वैश्य सभेचे अध्यक्ष संजय खंडेलवाल, राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, मारवाडी युवा मंचचे प्रांतीय उपाध्यक्ष रोहित रुंगटा, प्रांतीय सहमंत्री स्वप्नील जैन, अकोला शाखेचे अध्यक्ष भूषण अग्रवाल, खंडेलवाल नवयुवक मंडळाचे अध्यक्ष नरेश खंडेलवाल,खंडेलवाल महिला मंडळाच्या अध्यक्षा आरती खंडेलवाल आदी मान्यवर म्हणून उपस्थित होते. मारवाडी युवा मंचचे शाखा मंत्री निर्मल जैन यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. संजय खंडेलवाल यांनी



शिबिराचे महत्त्व अधोरेखित करीत मारवाडी युवा मंचच्या कार्याचे कौतुक केले. मंचाचे अध्यक्ष भूषण अग्रवाल यांनी खंडेलवाल वैश्य सभा व संपूर्ण खंडेलवाल समाजाचे आभार मानीत मंचच्या कार्याची माहिती दिली.

या शिबिरात नागरिकांना आधार कार्ड अपडेट, विवाह नोंदणी, आर्थिकदृष्ट्या कम कुवत व्यक्तींचे प्रमाणपत्र इत्यादी सेवा देण्यात आल्यात. पियुष खंडेलवाल यांनी आभार मानलेत. या शिबिरात सौ मंजू खंडेलवाल,सौ चंदा खंडेलवाल, मारवाडी संमेलनाचे अध्यक्ष सुरेश अग्रवाल, हरीश खंडेलवाल, मनीष खंडेलवाल, अनुप खंडेलवाल, प्रतीक खंडेलवाल, दीपक खंडेलवाल उपस्थित होते.

## थोडक्यात

### भुसावळ विभागात तिकीट मोहीमेला विक्रम यश

**अकोला :** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने तिकीटविना व अनियमित प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी तिकीट तपासणी मोहीम अधिक तीव्र केली असून, यामुळे प्रवासात शिस्तीचा प्रसार व महसूल सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. वाणिज्य विभागाने आपल्या कर्मचाऱ्यांच्या सम र्पित प्रयत्नांद्वारे तिकीटविना व अनियमित प्रवासाविरुद्ध ठोस पावले उचलून प्रामाणिक प्रवाशांसाठी सुरक्षित आणि आरामदायक सुनिश्चित केला आहे. प्रवास भुसावळ विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती इति पांडे यांच्या नेतृत्वाखाली मे २०२५ मध्ये भुसावळ विभागाने एकूण ११.१९ कोटींचा महसूल तिकीट तपासणीद्वारे मि ळवला असून, १ लाख १८ हजार प्रकरणे नोंदविण्यात आले. मे २०२४ मध्ये ७.८२ कोटींचा महसूल जमा झाला होता, त्यामुळे यंदा ४३. २२ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत तिकीट तपासणीद्वारे मिळवलेला एकत्रित महसूल २२. १२ कोटींवर पोहोचला आहे. या यशस्वी कामगिरीम ागे तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची निष्ठा व परिश्रम कारणीभूत आहेत. एप्रिल व मे २०२५ या दोन महिन्यांम ध्ये दोन कर्मचाऱ्यांनी विशेष कामगिरी करून संपूर्ण विभागात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. निसार खान हे भुसावळ विभागातील सर्वोत्कृष्ट तिकीट तपासणी कर्मचारी ठरले. एप्रिल २०२५ मध्ये १ हजार ५७७ प्रकरणे नोंदवून २५ लाख २० हजार ९०० चा महसूल जमा केला. मे २०२५ मध्ये १,५९७ प्रकरणांद्वारे त्यांनी जवळपास ३२ लाखांचा महसूल वसूल केला त्यांच्या अथक मेहनतीमुळे तिकीट तपासणी क्षेत्रात एक आदर्श उभा राहिला आहे. तसेच तिकीट निरीक्षक सी. पी. बडगे आपल्या विभागात अव्वल ठरले. एप्रिल महिन्यात त्यांनी ६४९ प्रकरणांतून १२ लाख ६८ हजार ६६० चा महसूल मिळवला. तसेच मे महिन्यात ८५० प्रकरणांद्वारे १८लाख ५२ हजार ४०० चा महसूल वसूल केला त्यांचे कार्य हे महसूल संरक्षण व प्रवासी सुविधा यामध्ये अमेनीटी कर्मचाऱ्यांचे वाढते योगदान अधोरेखित करणारे आहे. सदर उल्लेखनीय कामगिरी विभागाच्या रणनीतीपूर्ण नियोजनाची व कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक सेवाभावाची फलश्रुती आहे. भुसावळ विभाग तिकीट नियमांचे काटेकोर पालन, प्रवाशांच्या सोयी-सुविधा आणि रेल्वे सेवांची पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी अशा उपक्रमांद्वारे कटिबद्ध आहे.

# शाळांनी ठराविक ठिकाणीच साहित्य खरेदी करण्याची सक्ती करु नये

## सुराज्य अभियानचा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**▪अकोला,दि १५(प्रतिनिधी) :**

शाळांमध्ये प्रवेशाच्या वेळी पालक व विद्यार्थ्यांवर शालेय साहित्य, वह्या, पुस्तके व गणवेश ठराविक विक्रेत्याकडून खरेदी करण्याची सक्ती केल्या जात असल्याच्या विरोधात हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियान'च्या वतीने आज जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.सदर निवेदनात सांगण्यात आले की, छत्रपती संभाजीनगर, जळगाव व दिल्ली येथील जिल्हाधिकाऱ्यांनी अशा सक्तीविरोधात परिपत्रके काढली असून, अशा प्रकाराला आळा बसण्यासाठी अकोला जिल्ह्यातही तत्काळ तसेच आदेश निघावेत. पालकांनी कुठल्याही विक्रेत्याकडून सक्ती न करता त्यांच्या पसंतीने साहित्य खरेदी करणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे.या निवेदनात एकूण ११ मागण्या



करण्यात आल्या आहेत, ज्यात अशा सक्ती करणाऱ्या शाळांवर दंडात्मक कारवाई, संबंधित आदेश शाळांच्या फलकावर लावणे, तपासणी दौरे व हेल्पलाइन सुरू करण्याची मागणी आहे.

सदर निवेदन जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सौ. सुचिता पाटेकर यांनी स्वीकारले. त्या म्हणाल्या की, एखाद्या पालकांनी जरी तक्रार केली, तरी मी नक्कीच कारवाई करीन. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी अन्य काही विषयांवरही सविस्तर चर्चा केली व मार्गदर्शन केले.

सुराज्य अभियानच्या प्रतिनिधींनी त्यांच्या सकारात्मक भूमिकेबद्दल आभार मानले.सुराज्य अभियानच्या समन्वयक अधिवक्ता श्रीमती श्रुती भट, राष्ट्रभक्त अधिवक्ता समितीच्या श्रीमती दीपाली जानोरकर, सौ. मंजू सावरकर, राहुल चुटके आदि उपस्थित होते.

# बिहारातून घरुन निघून आलेली महिला परतली कुटुंबात

**▪अकोला,दि १५ (प्रतिनिधी) :**

रेल्वे पोलिस अकोला यांच्या मदतीने व केंद्र प्रशासक सखी वन स्टॉप सेंटर यांच्या पुढाकाराने बिहार येथून घरून निघून आलेली महिला कुटुंबात परतली आहे. शनिवार, १४ जून रोजी पुन्हा एका लाडक्या बहीणीला तिच्या कुटुंबाच्या स्वाधीन करण्यास महिला व बालविकास विभाग अंतर्गत सखी वन स्टॉप सेंटरला अवघ्या दोन दिवसात यश प्राप्त झाले.

सखीवन स्टॉप सेंटर हे केंद्रपुरस्कृत महिला व बालविकास विभागाव्दारे संचालीत केंद्र आहे. स्टेशनवर महिला एका मुलासोबत आढळून आली. तीला मदतीची आवश्यकता असल्याची माहीती रेल्वे पोलीस विभागांकडून सखी वन स्टॉप सेंटरच्या केंद्र प्रशासक ॲड. मनिषा भोरे यांना प्राप्त झाली. सदर महिलेस सखी वन स्टॉप सेंटर येथे दाखल करण्यात आले. जिल्हा सामान्य

रुग्णालय येथे पोलिसांमार्फत महिलेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. केंद्र संचालकांच्या संवादाला ती काही माहीती देत नव्हती व तिच्याद्वारा माहिती न मिळाल्याने रेल्वे पोलिस द्वारा प्राप्त गुरुवा पोलिस स्टेशन जिल्हा गया, राज्य बिहार येथे तक्रार दाखल असल्याचे समजले. ती महिला मात्र इतर काही सांगत नव्हती. रेल्वे पोलीस अकोला यांच्या मदतीने महिलेच्या वडिलांशी संपर्क साधण्यात आला व त्यांना सखी वन स्टॉप सेंटर अकोला येथे बोलाविण्यात आले.

दरम्यान, त्या महिलेचे वडील, भाऊ व काका हे तिला घेण्यासाठी सखी वन स्टॉप सेंटर अकोला येथे आले. बहीण भावांनी एकमेकांना पाहुण ते रडायला लागले. तिच्या वडीलांना विचारणा केली असता ती अकोला कशी आली हे आम्हांलासुध्दा माहीत नसल्याचे त्यांनी सांगीतले. सर्व दस्तऐवजांची पडताळणी करून व ओळख पटवुन त्या महिलेला तिचे वडील, भाऊ आणि काका यांच्यास्वाधीन करण्यात आले.

सदर प्रक्रिया जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. यामध्ये सखी वन स्टॉप सेंटरच्या कर्मचाऱ्यांचे अनमोल योगदान, रेल्वे पोलिस अकोला यांच्या मदतीने व केंद्र प्रशासक सखी वन स्टॉप सेंटर अकोला यांच्या पुढाकाराने मिळून १४ जून रोजी पुन्हा एका लाडक्या बहीणीला तिच्या कुटुंबाच्या स्वाधीन करण्यास महिला व बालविकास विभाग अंतर्गत सखी वन स्टॉप सेंटरला अवघ्या दिवसात यश प्राप्त झाले.

# आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रा

## महानगरात २१ जून,शनिवार ला राजराजेश्वर मंदिरात दर्शन सोहळा

**▪अकोला,दि १५ (प्रतिनिधी) :**

श्री श्री रविशंकर प्रणित आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनच्या वतीने राज्यभर सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रा आयोजित करण्यात आली आहे. ही पवित्र यात्रा १५ जून ते ६ जुलै २०२५ दरम्यान म हाराष्ट्रभर होणार आहे. या यात्रेद्वारे गुजरात मधील मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे अवशेष जनतेसमोर आणले जातील, जे भारताच्या संस्कृतीचा आणि अध्यात्मिक वारशाचा अमूल्य भाग आहेत.ही अवशेष त्या मूळ शिवलिंगाची आहेत, जी १०२६ ई.स.मध्ये महंमूद गजनी ने नष्ट केली होती. सोमनाथ मंदिर जे बाराही ज्योतिर्लिंगां मध्ये पहिले आहे.ते आजही श्रद्धेचे प्रतीक म्हणून उभे आहे. महमूद गजनीचा सन १०२६ मध्ये घडलेला विध्वंस सर्वात



भयंकर होता. लाखो भक्तांनी पूजलेले, आणि कधीकाळी जमिनीपासून तीन फूट वर तरंगत होते असे मानले जाणारे सोम नाथचे शिवलिंग त्याने उद्धवस्त केले.मात्र अग्निहोत्री ब्राह्मण कुळाने हे पवित्र अवशेष दक्षिण भारतात सुरक्षित ठेवले. स्वामी प्रणवानंद, स्वामी शिवानंद यांच्या सारख्या थोर संतांच्या हस्तांतरणा नंतर हे अवशेष तामिळनाडूमधील एका ब्राह्मण कुटुंबाकडे सुरक्षित ठेवण्यात आलेत. त्यांनी हे कांची शंकराचार्यांकडे नेले आणि भक्तांच्या समोर आणण्याची परवानगी मागितली. शंकराचार्यांनी आशीर्वाद देत सांगितले, 'आता वेळ आलेली आहे. हे अवशेष बेंगळुरूमधील गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्याकडे घेऊन जा. ते याला योग्य प्रकारे पुढे नेतील.' आणि आज गुरुदेवांच्या मार्गदर्शनात हे पवित्र अवशेष सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रेनिमित्त सर्वांसाठी उपलब्ध होत आहेत.ही यात्रा महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमधून जाणार असून लाखो भक्तांना या पवित्र अवशेषांचे दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे. पूजा, सत्संग, ध्यान व आर्ट ऑफ लिव्हिंगचे आध्यात्मिक कार्यक्रम यामध्ये सहभागी होता येईल. ही यात्रा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, भारताच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक पुर्नजागरणाचा भाग आहे.या यात्रेत सोम नाथ ज्योतिर्लिंग अवशेषांचे दर्शन,सत्संग, भजन, मार्गदर्शित ध्यान,आर्ट ऑफ लिव्हिंग प्रशिक्षकांद्वारे केले जाणार आहे.म हानगरात आर्ट ऑफ लिविंग अकोला शाखा,श्री शक्तिधाम परिवारव राजराजेश्वर मंदिर संस्थानच्या अकोला संयुक्त विद्यमाने दिनांक २० व २१ जून रोजी सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शन यात्रा स्वागत सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दिनांक २० जून रोजी स्थानीय गीता नगर येथील शक्तिधाम येथे रुद्र पूजा सोहळा होणार असून दिनांक २१ जून रोजी शिवभक्तांसाठी राजेश्वर मंदिरात सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यातील अनेक गावात ही सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शन यात्रा जाणार असून महिला, पुरुष शिवभक्तांनी या सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शन यात्रेच्या अवशेषांचा लाभ घ्यावा असे आवाहन आर्ट ऑफ लिविंग परिवार, अकोला ,श्री शक्तिधाम परिवार,अकोला व श्री राजराजेश्वर संस्थान,अकोला वतीने करण्यात आले आहे.

# एसटीच्या सर्व बसेस दहा वर्षात होणार इलेक्ट्रिक

अकोला : महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाला लवकरच नवे रूप मिळणार आहे. येत्या १० वर्षांत सर्व जुन्या एसटी बसेस टप्प्याटप्प्याने बंद करून त्यांच्या जागी नवीन, आधुनिक बसेस आणल्या जातील. विशेष म्हणजे, भविष्यात एसटीच्या सर्व बसेस इलेक्ट्रिक असतील, अशी महत्त्वपूर्ण घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रत सरनाईक यांनी बुधवारी एका कार्यक्रमात केली. तसेच, राज्यातील सर्व एसटी बस डेपो आणि स्थानकांचे अद्ययावतीकरण दोन महिन्यांत सुरू होणार असून, प्रवाशांच्या सुरक्षेला आणि स्वच्छतेला प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.एका कार्यक्रमादरम्यान माध्यमांशी बोलतांना सरनाईक यांनी एसटीच्या विकासाचा विस्तृत आराखडा सादर केला. ते म्हणाले की, एसटी महामंडळ लवकरच ५ हजार नवीन बसेस खरेदी करणार असून, त्यापैकी एक हजार बसेस इलेक्ट्रिक असतील. २०२४ पर्यंत एसटीच्या ताफ्यात २५ हजार बसेस दाखल करण्याचे उद्दिष्ट आहे. या 'स्माठी बसेसमध्ये प्रवाशांसाठी सर्व आवश्यक सोयी- सुविधा आणि अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा असतील. स्वारगेटसारख्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी बाहेरील व्यक्ती बसमध्ये सहज प्रवेश करू शकणार नाहीत, अशी यंत्रणा विकसित करण्यावर भर दिला जाईल. तसेच, आग किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देणारी यंत्रणाही बसेसमध्ये असेल. सरनाईक यांनी 'कमर्शियल व्हेईकल फोरम २०२५' परिषदेतही महाराष्ट्राच्या ई- वाहन धोरणावर प्रकाश टाकला.एसटी महामंडळाला सध्या ११ हजार कोटी रुपयांचा संचित तोटा असून, यावर श्वेतपत्रिका काढणार असल्याचेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

# अकोला–पातूर रस्त्यावर भीषण अपघात



■पातुर,दि १५ (प्रतिनिधी) : अकोला जिल्ह्यातील रस्ते अपघातांची मालिका काही केल्या थांबण्याचे नाव घेत नाही. अशातच शनिवार, दिनांक १४ जून २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ७:३० वाजता अकोला-पातूर मुख्य रस्त्यावर एक भीषण अपघात घडला. भंडारज-चिखलगाव जवळील रस्त्यावर भरधाव वेगात असलेल्या कारने मोटरसायकलला जबर धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला असून, कारचालक अपघातानंतर घटनास्थळावरून फरार झाला आहे.

अपघाताची माहिती अशी की, एमएच ०२ सीपी ६९१३ क्रमांकाच्या फोर व्हीलर कारने एमएच ३० एएस ८६७१ क्रमांकाच्या दुचाकीस्वारास जबर धडक दिली. धडक एवढी भीषण होती की मोटरसायकलस्वार रस्त्यावर दूर फेकला गेला. गंभीर जखमी अवस्थेत त्याला तातडीने अकोल्यातील सर्वोच्च रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

अपघातानंतर कारचालक घटनास्थळी क्षणार्धात पसार होण्यात यशस्वी झाला असून, पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. घटनेची माहिती मिळताच पातूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा करून पुढील कारवाई सुरू केली आहे. मृत व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम सुरु असून शवविच्छेदनासाठी मृतदेह अकोल्यातील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नागरिकांकडून वाहनचालकांच्या बेदरकार व अति वेगातील वाहन चालवण्यावर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासनाने रस्ते सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## युवकास जीवे मारण्याची धमकी

**तेल्हारा** : तेल्हारा शहरातील विश्वकर्मा सॉमील मागे गट ७/२/१ येथे मंगळवार दि. १० जून २०२५ रोजी दुपारी ३ ते ३.३० वाजे दरम्यान फिर्यादी प्रकाश धोंडीराम तराळे (६५) रा. भोकर ता. तेल्हारा जि. अकोला त्यांचे मालकीचे जागेवर हजर असताना आरोपी नामे जितेंद्र विनायक तराळे (५५), वनिता जितेंद्र तराळे (४८) दोन्ही रा. तेल्हारा जि. अकोला आणि रवींद्र डिगांबर सरप रा. वाडेगाव ता. बाळापुर जि. अकोला यांनी तेथे येऊन फिर्यादीचे जागेवरील सामान छेडछाड करू लागले म्हणून यातील फिर्यादी व त्यांचा मुलगा याने त्याला हटकले.

## मोबाईल चोरी प्रकरणी तिघांना अटक

**अकोला** : रेल्वे स्थानकावर जाण्यासाठी आलेल्या नागपूर व राजस्थान येथील प्रवाशांचे मोबाईल लंपास झाल्याची घटना १२ तारखेच्या पहाटेस उघडकीस आली होती रेल्वे पोलिसांकडे या संदर्भात तक्रार दाखल केल्यानंतर रेल्वे पोलिसांनी चौकशींती तिघांना या मोबाईल चोरी प्रकरणे अटक केली आहे बाहेरगावी जाण्यासाठी रेल्वे गाडीच्या प्रतीक्षेत असलेले प्रवासी पहुडलेल्या स्थितीमध्ये असल्याची संधी साधून अज्ञात चोराने नागपूर व राजस्थान येथील प्रवाशांचे चार मोबाईल लंपास केले होते या प्रकरणे पहाटे साडेचार वाजता या मोबाईल चोरीची तक्रार पोलीस दप्तरी दाखल करण्यात आली होती पोलिसांनी चौकशी अंती इराणी वसाहती मधील रहिवासी अमृतसिंग बड़े नायगाव येथील रहिवासी शेख सादिक शेख खालिक व अकोट फाईल येथील रहिवासी शहाबाज खान सुलेमान का या तिघांना अटक करून त्यांच्याजवळून गुन्ह्यातील चार मोबाईल व तीन हजार रुपये रोख असा एकूण ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे उघडकीस आलेल्या या कामगिरी बाबत रेल्वे पोलिसांनी प्रसिद्धीसाठी पाठवलेल्या प्रेस नोट मध्ये आरोपींना पकडणाऱ्या रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांची नावे होती.

# नेत्रदान करुन गरजूंना सृष्टीचा आनंद द्या

## प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

■अकोला,दि १५ (प्रतिनिधी) : नेत्रदानाचे महत्त्व जाणून घेण्यासाठी आणि त्याभोवती असलेल्या गैरसमजूती दर करण्यासाठी १० जुन ते १६ जुन या कालावधीत नेत्रदान साप्ताह साजरा केला जातो. नेत्रदान म्हणजे, एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे डोळे, डोळ्याच्या बुबुळाचा ( कॉर्निया) भाग, दुसऱ्या व्यक्तीला दान करणे.

हे दान कॉर्नियल इन्फेक्शनमुळे (बुबुळाचे संक्रमण) अंध झालेल्या लोकांना दृष्टी परत मिळवून देण्यासाठी केले जाते. नेत्रदान करण्यासाठी, व्यक्ती मृत्यूनंतर ४ ते ६ तासांच्या आत डोळे काढले जातात आणि प्रत्यारोपण केले जाते.

नेत्रदान करणारे कोणत्याही वयोगटातील किंवा लिंगाचे असू शकतात. चष्मा वापरणारे, मधुमेही, उच्च रक्तदाबाचे रुग्ण, दम्याचे रुग्ण आणि संसर्गजन्य आजार नसलेले लोक डोळे दान करू शकतात. मृत्यूनंतर, डोळ्याचा पारदर्शक, घुमटाच्या आकाराचा पुढचा भाग, कॉर्निया हा दान



केलेला प्राथमिक भाग असतो. कॉर्निया डोळ्यात प्रकाश केंद्रितकरण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, ज्यामुळे आपल्याला स्पष्टपणे पाहता येते.

कॉर्निया दान केल्याने दुखापत, आजार किंवा संसर्गामुळे कॉर्नियल अंधत्वाने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना दृष्टी परत मिळवण्यास मदत होते. डोळ्याचा उर्वरित भागकॉर्निया आणि स्क्लेरा प्रामुख्याने वापरले जातात, तर डोळ्याचे उर्वरित भाग संशोधन आणि शिक्षणासाठी वापरले जाऊ शकतात, ज्यामुळे नेत्ररोगशास्त्रातील प्रगतीला हातभार लागतोनेत्रदानाचे महत्त्व अधोरेखित करणारे महत्त्वाचे मुद्दे:दृष्टी पुनर्संचयित करणे - नेत्रदानाचे प्रमुख महत्त्व असे आहे की ते कॉर्नियल अंधत्वाने ग्रस्त असलेल्या व्यक्तींना दृष्टी परत मिळवून देण्यास मदत करते. एका दान केलेल्या डोळ्यांचा फायदा जास्तीत जास्त दोन लोकांनाहोऊ शकतो, ज्यामुळे त्यांना नवीन जीवन मिळू शकते.कॉर्नियल अंधत्वाचा उपचार- दुखापत, संसर्ग किंवा अनुवांशिक परिस्थितीमुळे जगभरात लाखो लोक कॉर्नियल अंधत्वाने ग्रस्त आहेत. या प्रकरणांवर उपचार करण्यासाठी आणि जागतिक अंधत्वाचा भार कमी करण्यासाठी नेत्रदान हा एकमेव प्रभावीमार्ग आहे. वैद्यकीय संशोधनाला प्रोत्साहन देणे- प्रत्यारोपणासाठी अयोग्य असलेले दान केलेले डोळे वैद्यकीय संशोधन आणि शिक्षणासाठी वापरले जाऊ शकतात. यामुळे नेत्ररोगशास्त्रातील प्रगती, चांगले उपचार आणि शस्त्रक्रिया तंत्रे विकसित होण्यास हातभार लागतो.

## मुंडगावच्या श्री गजानन महाराज पादुका सस्थांन कडुन पत्रकार बाळासाहेब नेरकर यांचा सत्कार

■हिवरखेड,दि १५(प्रतिनिधी) : हिवरखेड येथील जेष्ठ पत्रकार बाळासाहेब नेरकर गेल्या पाचवर्षापासून विदर्भाची माऊली मूंडगाव येथे गजानन महाराजाचे चरण पादुका असलेले भव्य मदीरच्या बारमाही कार्यक्रम पत्रकार म्हनून प्रसीद्धी देतात वीदर्भाची पढंरी, शेगाव प्रमाने येथे हि श्रीचे सर्व बारमाही कार्यक्रम मूंडगाव वासीयाचे सहकार्याने पार पडत असतात हे सस्थान रजीस्ठेशन असून येथे मदीर समीती कडुन देखरेख मधे सर्व कार्यक्रम महाप्रसाद दरगुरवारी लोकवर्गनी देनगीरुपाने श्रिचा महाप्रसाद गुरवारला दानदाते मार्फत राबवुन हजारो श्री भक्त शेगाव प्रमाने गुरवारी येथे गर्दी करतात येथील पादूका सस्थानची पालखी सालाबाद प्रमाने पंढरीच्या वाटेने वारकयासह गेलेली असुन यावर्षी शींदुर नावाने सैनिकाचा गौरव म्हनून वारकरी मळकरी पालखीसहित गेलेली आहे सदर हु बातमी सोबतच बारमाही कार्यक्रमाचे सवीस्तर बातमी पत्र नेहमीच मंदीराचे



कोषाध्यक्ष मीत्र वीजय ढोरे साहेब यांचे वतीने बाळासाहेब नेरकर आपल्या एम सी एन न्युज जळगाव तसेच महासागर वैराग्यमुरती या वृत्त पत्रातुन नेहमी प्रसीद्द करत असतात आज मुंडगाव येथे मीत्र सागर ऊगले सोबत पहील्यांदा मंदीरात दर्शनाला गेले असता मंदीर समीतीचे अध्यक्ष विलास बहादुरे गणेश ढोले शरद सोनटक्के विजय ढोरे महेश गाढे प्रवीन काळे राजेश खोकवे ज्वारशिग आसोले गणेश कळसकार यांचे अधिपत्याखाली मंदिराचे पुजारी कृष्णा महाराज पवार जनार्धन खलोकार, पंकज चौधरी शरद मसने या मान्यवराकडुन बाळासाहेब नेरकर यांचा शाल श्रिफळ श्री चा प्रसाद व आशीर्वाद पत्र देऊन सत्कार केलायावेळी बाळासाहेबानी मंदिर समीतीचे आभार मानत माऊलीची हि सेवा माझ्या हातुन घडवीनेसाठी खरे सूत्रधार वीजय ढोरे हे आहेत मी पादुका सस्थांन कडुन झालेला सत्कार सदैव मला लिखानरुपी सेवेची आठवण देत राहीलअसे सत्कारप्रसंगी बाळासाहेब नेरकर बोलले

## सविताताई शेळके राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

■अकोला,दि १५ (प्रतिनिधी) : दि १५ नगर येथे सरपंच संघटनेच्या वतीने सविता ताईनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतुन मार्ग काढून खचून न जाता मुलांना उच्चशिक्षण देऊन मुलीला च ऊ डॉक्टर आणि मुलाला इंजिनीयर बनवलं. विशेष म्हणजे त्यांनी एकल पालकत्वाची जबाबदारी पेलून समाजात आदर्श निर्माण केला या गोष्टीचा महिला म्हणून ताईचा सार्थ अभिमान आहे.आज दिनांक १५/६/२०२५ रोजी मा श्री मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते राज्य स्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्याबद्दल मनपूर्वकअभिनंदन अभिनंदनकर्ते ,राम मुळे मराठा महासंघ प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य सुरेश ठाकरे मराठा महासंघ जिल्हाध्यक्ष अकोला सुनीता ताथोड. मराठा महासंघ जिल्हाध्यक्ष अकोला आदेश अंधारे मराठा महासंघ कार्याध्यक्ष अकोलाअभिनंदनकर्ते मा राम मुळे मराठा महासंघ प्रदेश उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य मा सुरेश ठाकरे मराठा महासंघ जिल्हाध्यक्ष अकोला मा सुनीता मराठा महासंघ जिल्हाध्यक्ष अकोला मा आदेश अंधारे मराठा महासंघ कार्याध्यक्ष अकोला.

## डॉ. एच. एन.सिन्हा महाविद्यालयात श्री वासुदेव महाराज पालखीचे भक्तिभावपूर्ण स्वागत

■पातुर,दि १५ (प्रतिनिधी) : १३ जून २०२५ रोजी, शुक्रवारच्या पवित्र दिवशी, आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या श्री वासुदेव महाराज पालखी सोहळ्याचे डॉ. एच. एन. सिन्हा महाविद्यालय पातूर येथे मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.या पालखीचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण खंडारे यांच्या हस्ते मोठ्या आदरभावाने आणि उत्साहात संपन्न झाले. पालखी आगमनाच्या निमित्ताने संपूर्ण महाविद्यालय परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमप्रसंगी इतिहास विभाग प्रमुख प्रा. विनायक वसु, ग्रंथालय प्रमुख प्रा. अतुल विखे, मराठी विभाग प्रमुख डॉ. ममता इंगोले, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिपाली घोगरे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. हर्षद एकबोटे, प्रा. चंदन राठोड, डॉ. संजय खांदेल, प्रा.




रोनील आहाळे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी पालखीच्या स्वागतासाठी आपली उपस्थिती आणि सेवाभाव प्रकट केला.सायंकाळी सहा वाजल्यापासून हरिपाठ, भजन, कीर्तन या अध्यात्मिक कार्यक्रमांनी महाविद्यालयाचे वातावरण भक्तिरसात न्हालून गेले. विद्यार्थ्यांपासून ते प्राध्यापकांपर्यंत सर्वजण या भक्तीमय वातावरणात सहभागी झाले.सुमारे ३०० पायदळ वारकऱ्यांसाठी महाविद्यालयाच्या वतीने भोजन व राहण्याची उत्कृष्ट सोय करण्यात आली होती. कुठल्याही प्रकारची अडचण किंवा गैरसोय होऊ नये यासाठी प्राचार्य डॉ. किरण खंडारे स्वतः रात्री अकरा वाजेपर्यंत महाविद्यालयात उपस्थित राहून व्यवस्थेवर लक्ष ठेवत होते.

## थोडक्यात

### तेल्हारा आगारास उन्हाळी हंगामात ५.४१ कोटीचे उत्पन्न

**तेल्हारा** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या तेल्हारा आगारास माहे मार्च २०२५ ते मे२०२५ या तीन महिन्यातील उन्हाळी हंगामात ५ कोटी ४१ लाख ७ हजार २३० रुपये आर्थिक उत्पन्न प्राप्त झाले आहे. प्रवासी भारमान ९०.६२% आहे. तेल्हारा आगारातील बसेस मार्च २०२५मध्ये २८४१ १९८ किलोमीटर धावल्या असून त्याचे भारमान ९१ ०३ % आहे तर मिळालेले उत्पन्न १,८५,१६,३९१ रुपये इतके आहे. मार्च महिन्यातील नफा ०८.८१ लाख रुपये आहे. माहे एप्रिल २०२५ मध्ये बसेस २७८०६३ किलोमीटर धावल्या असून भारमान ९१.०७ % आहे . मिळिवलेले उत्पन्न १,८०, ३४, ४२३/- रुपये आहे. / - एप्रिल २०२५ मधील प्राप्त नफा०७.७९लाख रुपये आहे. माहे मे२०२५ मध्ये बसेस २७५३७५ किलोमीटर धावल्या असून भारमान ८९.७३% असून मिळिवलेले उत्पन्न कोटी ७५ लाख ५६ हजार ४१६ रुपये आहे या महिन्यातील प्राप्त नफा०४.१६ लाख रू. आहे. तेल्हारा आगारातील एकूण बस गाड्यांची संख्या मे२०२५ अखेरीस २५ असल्याची सूत्राची माहिती आहे.अकोला येथून दोन तर आकोट येथून १ अशा तीन बसेसतेल्हारा आगारात दाखल झाल्या आहेत. बसेस आल्याने जून २०२५ मध्ये बसेसची संख्या २८ झाली आहे. आज रोजी तेल्हारा आगारात एकूण कर्मचारी संख्या १६९ आहे. गत माहे जानेवारी २०२० नंतर तेल्हारा आगारास नवीन बस प्राप्त झालेल्या नाहीत. अशी विश्वसनीय माहिती आहे.

### अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ ही पुरोगाम विचारांची चळवळ

**अकोला** : अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ ही पुरोगामी विचारांची डोके चालवा चळवळ असुन विवेकाधिष्टीत समाज निर्मितीचे डॉ नरेंद्र दाभोळकर यांचे स्वप्न घेऊन समितीची वाटचाल सुरु असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती चे नवनियुक्त राज्य प्रधान सचिव विनायक सावळे नंदुरबार यांनी काल सायंकाळी अकोला येथे कार्यकर्ता संवाद सभेत केले. महा अंनिस च्या नव्या व जुन्या कार्यकर्त्यांची संवाद सभा घेऊन समितीचे कामकाजबाबत यावेळी चर्चा केली. यावेळी त्यांचे सोबत महा अनिसचे राज्य सरचिटणीस गजेन्द्र सरकार होते प्रारंभी जिल्हा कार्याध्यक्ष प्रा डॉ संजय तिडके यांनी पुष्पगुच्छ व ग्रामगीता देऊन विनायक सावळे यांचे तर पंजाबराव वर यांनी गजेन्द सुरकार यांचे स्वागत केले. प्रास्ताविकात प्रा तिडके यांनीयांनी अकोला जिल्ह्यातील अंनिसच्या कार्याची माहिती व शाखा स्थिती अहवाल सादर केला. गजेन्द्र सुरकार यांनी संघटनात्मक बांधणी याबाबत मार्गदर्शन केले रोहन बुंदेले यांनी सुत्रसंचालन केले तर डॉ प्रवीण वाघमारे यांनी आभार मानले यावेळी प्रशांत नागे प्रा पुंडलीक भामोदे आकाश हेरोळे शारदा वानरे देवकन्यांया चोपडे पायल वानरे यांचेसह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### रुईखेड परिसरात दमदार पाऊस; पेरणीला सुरुवात

रुईखेडः दिवसापासून सायंकाळच्या सुमारास रुईखेड परिसरात मेघगर्जनेसह दमदार पाऊस बरसल्यामुळे शेतकरी सुखावला आहे. कपाशी बियाणे व तुरीच्या बियाण्यांची टोकन पद्धतीने शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे. सध्या या भागातील शेतकरी पेरणीच्या लगबगीत दिसून येत आहेत.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From- **VEIDEHI VIJAYRAO DESHMUKH** - TO **VAIDEHI VIJAYRAO DESHMUKH** PASSPORT NO :- U3620872 **My Residential Address is** - 29 Chatrapati Shivaji Nagar Kondala road Washim 444505

# अकोला पेट्रोल डीलर असोसिएशनची कार्यकारणी गठीत

## अध्यक्ष राठी, कार्याध्यक्ष ठाकूर तर सचिव चावला

■अकोला,दि १५ (प्रतिनिधी) : जिल्ह्यातील पेट्रोल पंप धारकांच्या अडीअडचणी व समस्यांचे निराकरण करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या अखिल महाराष्ट्र पेट्रोल डीलर्स महासंघाशी संलग्नित अकोला पेट्रोल डीलर्स असोसिएशनची कार्यकारणी गठीत करण्यात आली. असो. च्या अध्यक्षपदी राहुल राठी यांची फेरनिवड करण्यात आली.कार्याध्यक्षपदी नवीन ठाकूर, सचिव पदी राजेश चावला, संयुक्त सचिव म्हणून राहुल पाटील,कोषाध्यक्ष म्हणून प्रभजीत सिंह साहनी, उपाध्यक्ष म्हणून गुरुपाल सिंह नागरा, नरेश अग्रवाल, बाल मुकुंद भिरड, आनंद अग्रवाल,राहुल सहसनानी कामकाज बघणार आहेत.तर असो. चे कार्यकारणी सदस्य म्हणून सचिन जाधव, जयेश पोपट,आशिष रुंगटा, संकेत अग्रवाल, दत्तात्रय कौशल, हेमंत आनंदानी, सोनू सेठी, हार्दिक बुब, बिट्टू पाचडे राहणार आहेत. शनिवारी स्थानीय मूर्तिजापूर रस्त्यावरील आरजी सभागृहात असो. ची सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या सभेत प्रमुख



पाहुणे म्हणून अखिल महाराष्ट्र पेट्रोल डीलर्स महासंघाचे अध्यक्ष अमित गुप्ता, महासंघाचे उपाध्यक्ष रमेश भूत ,विदर्भ पेट्रोल डीलर्स असो.चे सदस्य रवी जवादे,यवतमाळ पेट्रोल डीलर्स असो.चे अर्जुन जयस्वाल, असो.चे अध्यक्ष राहूल राठी आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या शाल व पुष्पगुच्छ देऊन केलेल्या सत्काराने या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. आपल्या प्रास्ताविकात असो.चे अध्यक्ष राहुल राठी यांनी असो. च्या एकंदर उपक्रमांची माहिती दिली. आपल्या मार्गदर्शनात महाससंघाचे अध्यक्ष अमित गुप्ता यांनी पेट्रोल डीलर विश्वातील भेडसावणाऱ्या समस्यांचा उहापोह केला. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी पेट्रोल पंपाचे लायसन्स, क्यूसीसी टीम, लीगल मेट्रोलॉजी अधिकारी,पेट्रोल पंप मध्ये असणाऱ्या सौंदर्य प्रसाधनाची व्यवस्था,पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांचा पगार, शासकीय योजना,जीएसटी, ट्रान्सपोर्ट टेंडर, पेट्रोल चोरी, पेट्रोल टँकची स्वच्छता, प्रॉडक्ट शॉर्टेज,पेट्रोल कंपन्यांचे धोरण आदी विषयावर संगोपांग मार्गदर्शन करीत आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पेट्रोल पंप धारकांनी एकसंघ होऊन संघटन सशक्तिकरणावर भर देत शासना कडून आपल्या समस्या सोडवण्याचे आवाहन केले.

## तेल्हायाच्या चिन्मयची जपान अभ्यास दौऱ्यासाठी निवड

**अकोला** : बाराव्या राष्ट्रीय इन्स्पायर अवार्ड मानक स्पर्धेत अकोला जिल्ह्यातील सेठ बन्सीधर विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय तेल्हारा येथील विद्यार्थी चिन्मय रामदास घावट याने 'इको फ्रेंडली स्ट्रॉ फ्रॉम व्हीट स्टॉक' या प्रतिकृतीचे सादरीकरण केले होते. यामध्ये शीत पेयासाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिकच्या 'स्ट्रॉ' ला त्याने गव्हाच्या काड्या पासून बनवलेल्या स्ट्रॉच्या रूपाने पर्यावरण पूरक असा पर्याय उपलब्ध करून दिला. चिन्मयची प्रतिकृती ही तेथे लेव्हल वन मध्ये निवडण्यात आली होती. भारतभरातून निवड करण्यात आलेल्या ५४ विद्यार्थ्यांपैकी महाराष्ट्रातील सात विद्यार्थ्यांची निवड जपान सायन्स अँड टेक्नॉलॉजी एजन्सी आणि सकुरा सायन्स हायस्कूल स्टुडन्ट एक्सचेंज प्रोग्राम यांच्याद्वारे सात दिवसीय जपान अभ्यास दौऱ्याकरता करण्यात आली.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

